MHNG180013962022

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १६१/२०२२**
**गुणवंत सदाशिव चरडे ..वि.. महाराष्ट्र शासन**

<u>**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**</u>
(पारीत दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी)

**०१.** सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये जप्त इनोव्हा 2 5 G G4 गाडी नोंदणी क्रमांक एम.एच.-३१/सी एन-७८१७, चेचिस क्र. KUN40704411705/06, इंजिन क्र. 2KD9666722 चा ताबा अंतरीम स्वरुपात मिळण्याकरीता केलेला आहे.

**०२.** सदर अर्जात अर्जदाराने नमूद केले की, पोलीस स्टेशन ऑफीसर कळमेश्वर यांनी अपराध क्रमांक ५५३/२०२२ अन्वये इनोव्हा 2 5 G G4 गाडी नोंदणी क्रमांक एम.एच.-३१/सी एन-७८१७ जप्त केली आहे. पो.स्टे.ऑफीसर कळमेश्वर यांनी सदर गाडी जप्त केली व ती त्यांच्याकडे मृत अवस्थेत पडून असून तिचा ताबा अंतरीम स्वरुपात अर्जदार यास न दिल्यास वाहनाचे नुकसान होईल. त्यामुळे सदरचे वाहन न्यायालयाने नेमुन दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहुन अंतरीम स्वरुपात अर्जदार यास देण्यास यावी अशी त्यांनी न्यायालयाला विनंती केलेली आहे.

**०३.** सदर अर्जावर तपासी अंमलदार व विद्वान सरकारी वकीलांचे म्हणणे मागविण्यात आले होते. सदर प्रकरणामध्ये दि. २९.०८.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. तपासी अंमलदाराने सदर वाहन अर्जदारास सुप्रतनाम्यावर देण्यास नकार दर्शविलेला आहे. त्याचप्रमाणे सरकारी अभियोक्ता यांनी वाहन अर्जदारास देण्यास हरकत घेतलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार जर आरोपीला वाहन देण्यात आले तर तो अश्याच स्वरूपाचा गुन्हा पुन्हा करू शकतो तसेच वाहनात फेरफार करू शकतो

तसेच ज्या ज्या वेळेस पुराव्यात गरज पडेल त्या त्या वेळी तो वाहन हजर करू शकणार नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार आरोप हा गंभिर स्वरूपाचा आहे. सदर प्रकरणात चौकशी सुरू असुन जर आरोपीला वाहन देण्यात आले तर वाहनात फेरफार करू शकतो त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** अर्जदाराने अर्जासोबत नि. क्र. ४ च्या दस्तऐवज यादी सोबत सदर वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राची पडताळीत प्रत, विवरणपत्राची छायांकित प्रत तसेच अर्जदारचे आधार ओळखपत्राची पडताळीत प्रत दाखल केलेल्या आहेत. सदरच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदार प्रस्तुत इनोव्हा 2 5 G G4 गाडी नोंदणी क्रमांक एम.एच.-३१/सी एन-७८१७, चेचिस क. KUN40704411705/06, इंजिन क. 2KD9666722 चा मालक असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. एकंदरीत अर्जाचे स्वरुप लक्षात घेता इनोव्हा 2 5 G G4 गाडी नोंदणी क्रमांक एम.एच.-३१/सी एन-७८१७ अर्जदारास अंतरीम स्वरुपात देण्यास कोणतीही हरकत दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार सदरचे वाहनाचा ताबा मिळविण्यास पात्र आहे. सबब, अर्जदारास अंतरिम स्वरुपात सदरचे वाहन खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस स्टेशन, कळमेश्वर येथील अपराध क्रमांक ५५३/२०२२ मध्ये जप्त केलेली इनोव्हा 2 5 G G4 गाडी नोंदणी क्रमांक एम.एच. -३१/सी एन-७८१७, चेचिस क. KUN40704411705/06, इंजिन क. 2KD9666722 चा अंतरिम ताबा अर्जदार गुणवंत सदाशिव चरडे यांना रक्कम रुपये २,००,०००/- (दोन लाख फक्त) च्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर रक्कम रुपये २००/-च्या मुद्रांकावर देण्यात येते.

३. अर्जदार यांना असेही निर्देशीत करण्यात येते की, सदर वाहनाच्या ओळखी संदर्भात कोणत्याही प्रकारे फेरफार करु नये तसेच त्याचे स्वरुपामध्ये बदल करु नये व विल्हेवाट लावु नये.

४. अर्जदाराने सदर वाहन न्यायालयाने निर्देशित केलेल्या दिवशी व वेळी हजर करावे.

५. अर्जदारास असेही निर्देशित करण्यात येते की, त्यांनी वाहनाचे इंजिन व चेसिसचा क्रमांक स्पष्टपणे त्यांच्या बंधपत्रामध्ये नमुद करावा व सदरचे बंधपत्र पोलीस स्टेशन ऑफीसर कळमेश्वर यांचे समक्ष सादर करावे.

६. अर्जदारास असेही निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मोबाईल क्रमांक स्पष्टपणे त्यांच्या बंधपत्रामध्ये नमुद करावा.

७. पोलीस स्टेशन ऑफीसर कळमेश्वर नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचे बंधपत्र दोषारोप पत्रासोबत न्यायालयात सादर करावेत.

८. संबंधीत पोलीस स्टेशन यांना पत्र देण्यात यावे.

स्वा/-
**(जे. डी. हुशंगाबादे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
कळमेश्वर.

दिनांक : १२.०९.२०२२
कळमेश्वर.

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P. D.F. File of Order are word to word, as per original Order.

(R.S. Daware)
Stenographer (Gr.III)

## <u>Endorsement</u>

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 12.09.2022 |
| Order dictated on | : | 12.09.2022 |
| Transcription ready on | : | 12.09.2022 |
| Order checked and signed off | : | 12.09.2022 |

Path /home/ubuntu/Desktop/Hushangabade mam/Bhoyar/Criminal / all types of order /Supratnama - 2022/Four Wheeler/R.C.C. No. 161- 2022 St- Gunwant date 12-09-2022 Four Wheeler- Innova.odt